मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या "कार्यवाही " व "अंमलबजावणी " चा आढावा घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.मुसका-२०१७/ई-२५६३५४०/का.१,
मुख्य सचिव कार्यालय,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१७.

वाचा : १) शासन निर्णय, सा.प्र.विभाग/मुख्य सचिव कार्यालय, क्रमांक: मंमंप्र-२०१४/ ई-११०१२/६/का.१, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४.
२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ चे शासन परिपत्रक.

शासन परिपत्रक

मंत्रिमंडळ प्रस्ताव सत्वर सादर करण्यासंदर्भात अंमलबविण्याची कार्यपध्दती व कालमर्यादेसंदर्भात संदर्भीय (१) येथील शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सर्व विभागांना आवश्यक ते निदेश देण्यात आले आहेत. तसेच संदर्भीय (२) येथील शासन परिपत्रकान्वये मंत्रिमंडळ निर्णयासंदर्भातील अंमलबजावणीची माहिती विहित प्रपत्र "अ" आणि "ब" मध्ये या कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२. मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्यानंतर संदर्भीय (२) येथील शासन परिपत्रकासोबतच्या विहित प्रपत्र "अ" आणि "ब" मध्ये संबंधीत निर्णयांच्या कार्यवाहीची माहिती मंत्रालयीन विभागांकडून मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येते. तथापि, दोन प्रपत्रातील माहितीमुळे निर्माण होणारी संदिग्धता दूरकरणेचे तसेच पुनरुक्ती टाळणेचे दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१) मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयासंदर्भात प्रत्येक महिन्याला मंत्रिमंडळासमोर सादर होणारा आढावा आणि मागील ३ वर्षात मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांचा विभागाकडून केलेल्या कार्यवाही आढाव्याबाबत **"अंमलबजावणी आढावा"** शासन परिपत्रकासोबतच्या जोडलेल्या सुधारित एकाच **प्रपत्रात** या कार्यालयास यापुढे सादर करण्यात यावा.

२) मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधीत मंत्रालयीन विभागांनी शासन निर्णय/ अधिसूचना/ अध्यादेश इत्यादी निर्गमित केला असेल तर रकाना क्र.५ मध्ये त्याचा तपशील द्यावा. मंत्रिमंडळ निर्णयाप्रमाणे अपेक्षित संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाली असल्यास रकाना क्र.६ मध्ये "कार्यवाही पूर्ण" असे नमूद करुन त्याखाली केलेल्या कार्यवाहीचे विवरण द्यावे. मंत्रिमंडळ निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु असून अद्याप पूर्ण झाली नसल्यास रकाना क्र.७ मध्ये "अंशत: कार्यवाही पूर्ण" असे नमूद करुन त्याखाली

कार्यवाहीचे विवरण द्यावे. मंत्रिमंडळ निर्णय झाल्यानंतरही प्रत्यक्षात क्षेत्रीय स्तरावर अद्याप कार्यवाही सुरुच होऊ शकली नसल्यास रकाना क्र.८ मध्ये “कार्यवाही अपूर्ण” असे नमूद करुन त्याखाली कार्यवाही सुरु होऊ न शकल्याची कारणमिमांसा द्यावी.

३. वरीलप्रमाणे विहित प्रपत्रामध्ये माहिती संदर्भाधिन शासन निर्णय व शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार या कार्यालयाकडे न चुकता सादर होईल, याबाबत संबंधित विभागांचे सचिव यांनी कृपया दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७११२३१६३८३९५१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sumit Mullick
Date: 2017.11.23 17:21:47
+05'30'

(सुमीत मल्लिक)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / सचिव
३. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. निवड नस्ती (का.१)

सामान्य प्रशासन विभाग, मुख्य सचिव कार्यालय, शासन परिपत्रक क्र.मुसका-२०१७/ई-२५६३५४०/का.१, सोबतचे " प्रपत्र "

मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रत्यक्षात केलेल्या

"अंमलबजावणीचा अहवाल"

अ.क्र.	बैठकीचा दिनांक व विषय क्रमांक	विषय	संबंधित विभाग	शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक	कार्यवाही पूर्ण (पूर्णत्वाचा तपशील)	अंशत: कार्यवाही पूर्ण (एकूण उद्दीष्ट व त्यापैकी पूर्ण झालेले उद्दीष्ट, संपूर्ण उद्दीष्टपूर्तीचे नियोजन इत्यादीचा तपशिल)	कार्यवाही अपूर्ण (अंमलबजावणी न होण्याची कारणे व त्यावर उपाय)
१	२	३	४	५	६	७	८